**विशेष घटक योजनेतून मागासवर्गीय (अनुसूचित जाती) सूत गिरण्यांना दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:एमपीसी १०९९/प्र.क्र.२४४/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३० मार्च, २०००

वाचा:- आयुक्त,समाजकल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.विघयो १९९/सुगि/कर्ज/९९-२०००/का-१४/६५/७१ दि. ३ / ९ मार्च,२०००

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र राज्यात आठव्या पंचवार्षिक योजना काळात स्थापन केलेल्या व शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने पुरस्कृत केलेल्या सहकारी क्षेत्रातील मागासवर्गीयांच्या सूत गिरण्याना तदर्थ पध्दतीने सन १९९७-९८ पासून वैयक्तिक प्रकरणामध्ये दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात आले. मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांच्या या प्रकल्पाची किंमत सुमारे रु.४० ते रु.४५ कोटी असून त्याच्या जवळपास ५ टक्के एवढे भाग भांडवल सूत गिरण्याने स्वत: जमा करावयाचे आणि नंतर शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने सूत गिरण्याने जमा केलेल्या भाग भांडवलाच्या ९ पट शासनाने भाग भांडवल द्यावयाचे अशारितीने भाग भांडवल जमा केल्यावर निधीचा उर्वरित पुरवठा करण्यासाठी अशा सूत गिरण्यानी खुल्या बाजारातून निरनिराळया कर्ज देणाऱ्या संस्थांकडून भांडवल उभारुन सूत गिरण्या चालवाव्यात अशी योजना होती.

अशा मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांना खुल्या बाजारातील कर्ज देणाऱ्या संस्था कर्ज देण्यास नाखुष असल्यामुळे शासनाने त्या मागासवर्गीयांच्या आलेल्या [illegible] कर्जावर [illegible] करण्याची पध्दती सुरु केली. यामुळे मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांना दिर्घ मुदतीचे कर्ज देण्याबाबत एक सर्व समावेशक धोरण निश्चित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-** शासनाने या बाबतीत पूर्ण विचार करुन आता असा निर्णय घेतला आहे की, खालील परिच्छेदांतील अटीवर मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांना दिर्घ मुदतीचे कर्ज देण्यात येईल :-

१) मागासवर्गीयांच्या (अ.जा.) प्रस्तावित सहकारी सूत गिरण्यांनी प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के आणि कमीत कमी रु.८०.०० लाखापर्यंत सभासद भागभांडवल गोळा केल्यास सदर गिरण्या कर्जाकरिता पात्र समजण्यात येतील.

२) शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने १:९ याप्रमाणे त्यांचे शासकीय भाग भांडवल वितरीत करावे. शासकीय भाग भांडवल वितरीत झालेल्या गिरण्या योग्य प्रमाणात शासनाकडून कर्ज मिळणेस पात्र रहातील.

३) सहकारी सूत गिरण्यांनी सादर केलेला प्रकल्प अहवाल मुल्यांकित करण्याकरिता मुदत कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था/बँका यांचे व्यतिरिक्त खालील शासन पुरस्कृत संस्थांपैकी एका संस्थेकडून तपासून मुल्यांकित करुन घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावे. मुल्यांकन कामाचे शुल्क रु.२.५० लाख इतके निश्चित करण्यात येत आहे. तसेच प्रकल्प मूल्यांकनाचा जो खर्च दर्शविला आहे तो संबंधित गिरणीने सोसणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र इंडस्ट्रीयल ॲण्ड टेक्नीकल कन्सलटन्सी ऑरगनायझेशन लिमिटेड (मिटकॉन),पुणे

२) ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन,मुंबई.

३) दत्ताजीराव टेक्नीकल इन्स्टीटयूट , इचलकरंजी.

४) सदर गिरणीचा प्रकल्प उभारताना जी संनियंत्रण कमिटी राहील त्यामध्ये शासनाचा ( समाजकल्याण व वस्त्रोद्योग विभागाचा ) प्रतिनिधी असावा.

५) सूत गिरणीच्या संचालक मंडळावर शासन ( समाजकल्याण तसेच वस्त्रोद्योग विभागाचा ) नियुक्त करेल अशी व्यक्ती शासन नियुक्त संचालक म्हणून राहील.

६) प्रकल्प उभारणीकरिता ५२ आठवडयाचा कालावधी असावा व त्या सहकारी सूत गिरणीस निधीची आवश्यकता लागेल त्याप्रमाणे निधी वितरित करावा. संचालक (वस्त्रोद्योग) व आयुक्त (समाजकल्याण) यांनी त्याप्रमाणे शासनाच्या प्रचलित धोरणाच्या अधीन राहून हा निर्णय घ्यावा.

७) शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडून घेण्यात यावे. कर्जाच्या रक्कमेचा विनियोग योग्य प्रकारे न झाल्याचे आढळल्यास किंवा अन्य गैर प्रकारामुळे कर्जाची रक्कम अनुज्ञेय नसल्याचे आढळल्यास दिलेली रक्कम महसूली थकबाकी म्हणून वसुल करण्यात येईल.

८) सहकारी सूत गिरण्यांना जे स्वतःचे भागभांडवल आणि शासकीय भागभांडवल जेवढे उभारले असेल त्याच्या १:१ प्रमाणात दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे.

९) दिलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जावर प्रचलित दराने (शासनाच्या वित्त विभागाने ठरवून दिल्याप्रमाणे ) व्याज आकारावे. कर्जाची परतफेड करण्याकरिता समान तिमाही हप्ते निश्चित केले जावेत. कर्ज परतफेडीचा कालावधी ६ वर्षाचा असावा.

१०) समाजकल्याण विभागाचा संचालक आयुक्त व अध्यक्ष (संबंधित सूत गिरणी) यांच्या नांवे संयुक्तीक खाते उघडावे व त्यांनी संयुक्तपणे कार्यान्वित (ऑपरेट) करावे.

११) ज्या कामाकरिता दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर केले आहे त्या कामाकरिता सहकारी सूत गिरण्यांनी त्याचा वापर करावा. गैरवापर दिसून असल्यास दंडात्मक व्याज दरासह महसूल थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१२) जो कर्जाचा हप्ता अगोदर दिला असेल त्याचा वापर केला आहे. अशा प्रकारचे प्रमाणपत्र संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग ,नागपूर यांच्याकडून घ्यावे व त्यानंतर दुसरा हप्ता वितरीत करावा.

१३) कर्जाची परतफेड प्रकल्प सुरु झाल्यानंतर २ वर्षानी सुरु करण्यात यावी. कर्ज वसुलीची जबाबदारी ही आयुक्त, समाजकल्याण.पुणे यांची राहील व कर्ज वसुलीचा विलंबावधी हा वित्तीय संस्थांप्रमाणेच असावा.

१४) मागासवर्गीय (अ.जा.) सूत गिरणीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा असावा.

१५) सूत गिरणीच्या संचालक मंडळावर/कार्यकारणीवर सर्वच सदस्य अनुसूचित जातीचे असावेत. केवळ एक सदस्य अमागासवर्गीय असेल

१६) या सूत गिरणीमध्ये ७० टक्केपेक्षा जास्त अनुसूचित जातीचे सभासद असतील यासंबंधीची खात्री संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी व संबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी व आयुक्त संचालक, समाजकल्याण यांनी करुन घ्यावी व अशी खात्री झाल्यानंतरच निधीचे वाटप करावे.

१७) संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नांवाचा ७/१२ चा उतारा पाठवावा. त्याचबरोबर कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत पाठवावी व आयुक्त/ संचालक, समाजकल्याण यांनी तशी खात्री करुन घ्यावी.

१८) गहाण खताचा प्रचलित कायद्यानुसार करारनामा करावा. गिरणी शासन व वित्तीय संस्था या दोघांकडून कर्ज घेणार आहेत. गहाण खतावर पहिला हक्क वित्तीय संस्थेचा राहील तर दुसरा हक्क शासनाचा राहील. गिरणीचे जे संचालक मंडळ असेल त्या संचालक मंडळालाही कर्जासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार धरावे लागेल.

१९) संस्थेच्या खरेदी केलेल्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा व सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले तसे प्रमाणपत्र सादर करावे. सदर प्रमाणपत्रात संस्थेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

२०) आवश्यक असेल तेथे बिगर शेती परवाना घेऊन त्याची सत्यप्रत पाठवावी. बिगर शेती परवान्याची मुदत संपली असल्यास मुदतवाढीचे आदेश सादर करावेत.

२१) शासन (वित्त/वस्त्रोद्योग विभाग) इतर सहकारी संस्थांनी कर्ज भागभांडवल देतेवेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात त्या सर्व अटी या प्रकरणी लागू होतील.

२२) प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहित करेल. त्या अटी /शर्ती बंधनकारक राहतील.

२३) वरील १ ते २२ येथील अटी व शर्ती प्रमाणे तपासून प्रस्ताव योग्य आहे किंवा नाही. याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त/संचालक ,समाजकल्याण संचालनालयाची राहील.

२४) विहित पध्दतीने अर्ज करणाऱ्यांच्या बाबतीतच विचार करता येईल.-

आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावापैकी एकूण ११ मागासवर्गीय कारी सूत गिरण्यांच्या बाबतीत सखोल चौकशी करुन आता खालील मागासवर्गीय सहकारी सूत ण्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.१६३९.८८ लाख दिर्घ मुदतीचे कर्ज म्हणून सन या शासन निर्णयाद्वारे मंजूर करीत आहे. हे कर्ज तत्संबंधी लिहिलेल्या शेऱ्यातील त्रुटीची पूर्तता त्यानंतर त्यांना प्रत्यक्ष वितरित होईल. या तीनही सूत गिरण्यांना मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम युक्त, समाजकल्याण, पुणे यांनी त्वरित काढून त्यांचे व गिरण्याचे संयुक्त खात्यात जमा करावी. व माची प्रगती जसजशी होईल तसतसे गिरणीला निधी पुरविण्याचे काम करावे. दर महिन्यात गिरण्यानी केली प्रत्यक्ष भौतिक प्रगतीबाबत गिरण्यांकडून अहवाल घेवून व आपल्या कनिष्ठांकडून त्याची रसणी करुन घेवून आयुक्तांनी गिरण्यांना पैशाचा पुरवठा करावा.

| | रु. लाखांत | |
|---|---|---|
| १) महात्मा फुले मागासवर्गीय सहकरी सूत गिरणी मर्या. काघोली, जि.सोलापूर | ८८१.५३ | सदर गिरणीने पूर्वीच्या कर्जाचे उपयोगिता प्रमाणपत्र दिले नाही ते मिळाल्यावर कर्ज मंजूरीचा विचार करता येईल. |
| २) प्रियदर्शनी अनुसूचित जाती जमाती सहकारी सूत गिरणी मर्या. लातूर | २०२.७३ | या जमिनीवर आता बोजा नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर कर्ज मंजूरीबाबत विचार करता येईल. |
| ३) महत्मा फुले मागासवर्ग सहकारी सूत गिरणी,पेठवडगांव,जि.कोल्हापूर | ५५५.६२ | जमीन बोजा विरहित असल्याचे प्रमाणपत्र लेखा परीक्षा अहवाल प्राप्त झाल्यावर विचार करता येईल. |

यासाठी होणारा खर्च " मागणी क्र. एन-११-६२२५ -अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी कर्जे-०१-अनुसूचित जातीचे कल्याण -१९५ सहकारी संस्थांना

कर्जे (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना वि.घ.यो (दोन) (एक) अनुसूचित जातींच्या सहकारी सूत गिरण्याना कर्ज (६२२५ ०२३२)" या लेखा शिर्षाखाली चालू वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. यासाठी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या बाबींच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१८/२०००/व्यय-११ दिनांक २९-३-२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच याबाबतची रक्कम रुपये १ कोटीपेक्षा अधिक असल्याने अर्थोपाय शाखेचा अनौपचारिक संदर्भ क्र.सीआर १५०/ अर्थोपाय दिनांक ३०-३-२००० अन्वये हयास सहमती देण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र. मु. भिशीकर

( प्र. मु. भिशीकर )

उप-सचिव, महाराष्ट्र शासन

प्र. मु. भिशीकर

प्रति,

आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक,हातमाग यंत्रमाग,वस्त्रोद्योग,नागपूर

वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे

जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर, कोल्हापूर, लातूर

जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर, कोल्हापूर, लातूर

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,पुणे

महालेखापाल,महाराष्ट्र-१मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)

विभागीय समाजकल्याण अधिकारी पुणे ,औरंगाबाद,

सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

जिल्हाधिकारी, कोल्हापूर, लातूर, सोलापूर

वित्त विभाग (का.व्यय-११, अर्थ-३ व ५) मंत्रालय, मुंबई

सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, ५ वा मजला मंत्रालय, मुंबई

विभागीय संचालक, हातमाग, वस्त्रोद्योग, नागपूर

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

अध्यक्ष, महात्मा फुले मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी,मर्या.वाघोली.जि.सोलापूर

अध्यक्ष, महात्मा फुले मागासवर्ग सहकारी सूत गिरणी.पेठ वडगांव.जि.कोल्हापूर,

अध्यक्ष, प्रियदर्शनी अनुसूचित जाती जमाती सकारी सूत गिरणी मर्या.लातूर

निवड नस्ती विघयो-२